## वार्ता टिपण दिनांक १८/०७/२०१९

## किं.रू. ३,८६,२५०/- रु चा २५ किलो गांजाची वाहतुक करणा-या दोघांना खंडणी विरोधी पथक,गुन्हे शाखा,पुणे यांचेकडुन अटक

दिनांक १८/०७/२०१९ रोजी गुन्हे शाखेकडील खंडणी व अंमली पदार्थ विरोधी पथक, पश्चिम, या पथकाचे प्रभारी पोलीस निरीक्षक गजानन पवार हे त्यांचे स्टाफसह हडपसर पोस्टेचे हददीत अंमली पदार्थ विक्री संदर्भाने गस्त घालीत असताना, पोलीस कर्मचारी प्रदिप शिंदे व एकनाथ कंधारे यांना त्यांचे विश्वासु बातमीदारांकडुन बातमी मिळाली की, मांजरी कडून दोन इसम एका दुचाकी गाडीवर एका पोत्यात गांजा घेवून गि-हाईकाला देण्यासाठी निघाले आहेत. अशी बातमी मिळालेने लागलीच पोलीस निरीक्षक श्री.गजानन पवार यांनी व पोलीस उपनिरीक्षक श्री.निखील पवार व आनंद रावडे यांनी स्टाफसह सापळा रचुन घुले वस्ती, मांजरी रोडवर, राज स्टील दुकाना समोर, सार्वजनिक रोडवर मांजरी हडपसर पुणे येथे इसम नामे १) सुमित भाऊसाहेब बर्वे वय-२३ वर्ष रा.ताम्हाणे वस्ती, भरतगाव रोड, बोरी एंदी, ता.दौंड, जि.पुणे व २) पंकज अभिमन्यु रणवरे वय-३० वर्ष रा.आंबेडकरनगर, रामकृष्ण अपार्टमेंट, फ्लॅट नं.३०१, महाबळेश्वर हॉटेल जवळ, बाणेर पुणे यांनी त्यांचे ताब्यात किंमत रुपये ३,८६,२५०/- चा २५ किलो १७० ग्रॅम वजनाचा गांजा / अंमली पदार्थ हा दुचाकी गाडी क्र.एमएच४२/सी/४२९९ या दुचाकी गाडीवरुन विक्री करण्यासाठी अनाधिकाराने, बेकायदेशिररित्या, अनधिकृतपणे स्वतःजवळ बाळगून घेवून जात असताना मिळालेने ते दोन पंचासमक्ष जप्त करून ताब्यात घेतले आहेत. त्याबाबत हडपसर पोस्टे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सदर गुन्हयात वर नमुद दोन्ही इसमांना अटक करण्यात आली आहे.

**सदरची कामगिरी ही गुन्हे शाखेचे अपर पोलीस आयुक्त मा.श्री.अशोक मोराळे सो., पोलीस उप आयुक्त श्री.शिरीष सरदेशपांडे सो.,सहा.पोलीस आयुक्त श्री.समीर शेख सो.यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी पोलीस निरीक्षक गजानन पवार, पोलीस उप निरी.आनंद रावडे, निखिल पवार, पोलीस कर्मचारी प्रदिप शिंदे,एकनाथ कंधारे,संतोष मते,अविनाश मराठे, शिवानंद बोले, महेश कदम,विजय गुरव व फिरोज बागवान यांनी केली आहे.**